# <u>आरती</u>

निराकार आकार निर्गुण रूप गणेशा तुझे रूप तेज स्वरूप

तुझ्या आरतीला नभी लक्ष दीप कसे सांग वर्णू तुझे दिव्य रूप ..

ॐ गण गणपती पिता पुत्र सर्व रुपी ॐ गण गणपती पिता पुत्र सर्व रुपी

पायाशी दुर्वा तुझ्या भाळावर चंद्र

भुईपसुन नभापर्यंत तूच तू राजेंद्र -धृ-

मुखी तुझ्या रवी तेज, मन तुझे शांत

मंगल करी सकल  बुद्धी तुझी प्रगल्भ

वाणी तुझी गुरूची, माया तुझी शुक्राची

वचक जरी शनीचा , राहू-केतू दास

नवग्रह आवार तुझे  असा तू ईश्वर -१- भुईपसुन नभापर्यंत तूच तू राजेंद्र

गुण तुझे नक्षत्र आकाश गंगा सद्गुण

धुमकेतू किमया तुझी , तुझे वलय माया माझी

माझा मोह तुझ्यापाशी, माझे स्वप्न तुझी राशी

अति नाही हाव माझी, एक उल्का हर दिनी

अंतराळ करी साकार, असा तू ईश्वर -२- भुईपसुन नभापर्यंत तूच तू राजेंद्र